**प्रेस नोट दि. ३०.०६.२०२६ ला.प्र.वि.सांगली युनिट**

**आरोपी लोकसेवक श्री. विक्रम विठ्ठल घोदे वय-४० वर्षे, पद – पोलीस कॉन्स्टेबल ब.नं./१७९६ नेमणुक – जत पोलीस ठाणे यांनी तक्रारदार यांचा भाऊ व पुतण्या यांचेविरूध्द जत पोलीस ठाणे येथे चोरीचा गुन्हा दाखल न करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे प्रथमतः दोन लाख रूपयांची मागणी करून तडजोडी अंती १,६०,०००/- रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम काशीराम माने, पोलीस पाटील यांचेकडे देणेस सांगितले. व आरोपी लोकसेवक श्री. काशीराम कृष्णा माने वय- ३६ वर्षे पद- पोलीस पाटील, सिध्दनाथ गांव यांनी तक्रारदार यांचेकडून लोकसेवक विक्रम घोदे यांनी सांगितल्याप्रमाणे लाच रक्कम स्वीकारण्यास संमती दर्शवून तक्रारदार यांना त्यांचा भाऊ व पुतण्या यांचेविरूध्द चोरीचा गुन्हा दाखल न होणेकरीता विक्रम घोदे, पोकॉ/१७९६ जत पोलीस ठाणे यांना लाचेची रक्कम देण्यास प्रोत्साहन दिले आहे व लोकसेवक विक्रम घोदे पोकॉ/१७९६ यांचे सांगणेवरून लाच रक्कम स्वीकारणेचा प्रयत्न केला आहे. या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली विभागाची कारवाई..**

| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **सांगली** |
|---|---|
| **पोलीस स्टेशन** | जत पोलीस ठाणे, जि.सांगली |
| **गुन्हा नोंद क्रमांक व कलम** | **गु.र.नं. ३८१/२०२६ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७,१२ प्रमाणे** |
| **तक्रारदार** | पुरुष वय २७ वर्षे |
| **आरोपी लोकसेवकाचे नांव व कार्यालय** | १) विक्रम विठ्ठल घोदे वय-४० वर्षे व्यवसाय- नोकरी पोकॉ/१७९६ नेमणुक – जत पोलीस ठाणे रा. शंकर जाधव यांचे घरी भाडेतत्वावर, मोरे कॉलनी, जत ता.जत, जि.सांगली<br>२) काशीराम कृष्णा माने वय- ३६ वर्षे, पोलीस पाटील, सिध्दनाथ गांव रा. माने वस्ती ता.जत, जि.सांगली |
| **पडताळणी कारवाई वेळी मागणी केलेली लाचेची रक्कम व दिनांक** | दि.२०.०४.२०२६ रोजी २,००,०००/- रूपये तडजोडीअंती १,६०,०००/- रूपये लाचेची मागणी |
| **सापळा कारवाई वेळी स्विकारलेली लाचेची रक्कम** | - |
| **लाचेची मागणी दिनांक व ठिकाण** | दि.२०.०४.२०२६ रोजी १,६०,०००/- रूपये मुचुंडी गावाजवळील आर.आर. ढाब्याजवळ लाचेची मागणी केली आहे. |
| **थोडक्यात हकीकत** | यातील तक्रारदार यांनी लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली येथे दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दि. २०.०४.२०२६ रोजी पडताळणी कारवाईमध्ये आरोपी लोकसेवक श्री. विक्रम विठ्ठल घोदे, पोकॉ/१७९६ जत पोलीस ठाणे यांनी आपले पदाचा दुरूपयोग करून स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता तक्रारदार यांचे भाऊ व पुतण्या यांचेविरूध्द जत पोलीस ठाणे येथे चोरीचा गुन्हा दाखल न करणेसाठी तक्रारदार यांचेकडे प्रथमतः २,००,०००/- रूपयांची लाचेची मागणी करून तडजोडीअंती विक्रम घोदे, पोकॉ/१७९६ यांनी १,६०,०००/- रूपये पोलीस पाटील, काशीराम माने यांचेकडे देणेस सांगितलेले आहे.<br>आरोपी लोकसेवक काशीराम कृष्णा माने, पोलीस पाटील,सिध्दनाथ गांव यांनी तक्रारदार यांचेकडून लोकसेवक विक्रम घोदे यांनी सांगितल्याप्रमाणे लाच रक्कम स्वीकारण्यास संमती दर्शवून तक्रारदार यांना त्यांचा भाऊ व पुतण्या यांचेविरूध्द चोरीचा गुन्हा दाखल न होणेकरीता विक्रम घोदे, पोकॉ/१७९६ जत पोलीस ठाणे यांना लाचेची रक्कम देण्याकरीता प्रोत्साहन दिले तसेच विक्रम घोदे पोकॉ/१७९६ यांचे सांगणेवरून लाच रक्कम स्वीकारणेचा प्रयत्न केला आहे.<br>वरील सर्व बाबींवरून आरोपी लोकसेवक १) विक्रम विठ्ठल घोदे वय-४० वर्षे व्यवसाय- नोकरी पोकॉ/१७९६ नेमणुक – जत पोलीस ठाणे रा. शंकर जाधव यांचे घरी भाडेतत्वावर, मोरे कॉलनी, जत ता.जत, जि.सांगली, २) काशीराम कष्णा माने वय- ३६ वर्षे, पोलीस पाटील, सिध्दनाथ गांव रा. माने वस्ती ता.जत, जि.सांगली यांचेविरूध्द जत पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ३८१/२०२६ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७,१२ प्रमाणे दि. ३०.०६.२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| **तपासी अधिकारी** | श्रीमती. यास्मीन इनामदार, पोलीस उप अधीक्षक, ला. प्र. वि. सांगली |
| **मार्गदर्शन अधिकारी** | पोलीस उप-आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे,<br>अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे |
| **सापळा पथक** | श्रीमती यास्मीन इनामदार, पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली, श्री.योगेश चव्हाण, पोलीस निरीक्षक तसेच पोलीस अंमलदार प्रितम चौगुले, अजित पाटील,पोपट पाटील, उमेश जाधव, सलीम मकानदार, ऋषिकेश बडणीकर, रामहरी वाघमोडे, धनंजय खाडे, सुदर्शन पाटील,वीणा जाधव,प्रकाश जाधव,मनोज निळकंठ, सागर नायकुडे, राजेश मुदगल, चंद्रकांत जाधव, महेश शेंडगे, |

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४, व्हॉट्स अॅप व मोबाईल नंबर ९४०४०४१०६४ वर संपर्क साधावा.

**श्रीमती यास्मीन शरीफ इनामदार**
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,**
**सांगली**

Scanned with OKEN Scanner